(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

२०२३ एस. सी. सी. ऑनलाईन एस. सी. ४०९

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

(न्यायमूर्ति अजय रस्तोगी आणि न्यायमूर्ति सी. टी. रविकुमार यांच्या समक्ष)

<u>दिवाणी अपील क्र. ५३५२-५३५३/२००७</u>

नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड............ अपीलकर्ते ;

विरुद्ध

हर्सोलिया मोटर्स आणि इतर .... उत्तरवादी.

सह

दिवाणी अपील क्र. ५३५४/२००७

दिवाणी अपील क्र. २८२१/२०१२

दिवाणी अपील क्र. ३३५०/२०१८

दिवाणी अपील क्र. /२०२३

(@ विशेष परवानगी याचिका (दिवाणी) क्र. १०३९/२०२०)

दिवाणी अपील क्र. ५३५२-५३५३/२००७; दिवाणी अपील क्र. ५३५४/२००७; दिवाणी अपील क्र. २८२१/२०१२; दिवाणी अपील क्र. ३३५०/२०१८; आणि दिवाणी अपील क्र. /२०२३ ची (@विशेष परवानगी याचिका (दिवाणी) क्र. १०३९/२०२०)

पारित दिनांक १३/०४/२०२३

या प्रकरणात हजर राहिलेले अधिवक्ता :
पक्षांसाठी अधिवक्ता

श्री. पी. के. सेठ, अधिवक्ता.;

कु. मंजीत चावला, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

श्रीमती उषा पंत कुकरेती, अधिवक्ता.;

श्री. चंद्रभूषण तिवारी, अधिवक्ता.;

श्री. बिष्णु प्रसाद तिवारी, अधिवक्ता.;

श्री. राकेश कुमार यादव, अधिवक्ता.;

श्री. निलेन्दु वात्स्यान, अधिवक्ता.;

श्री. राजीव रंजन, अधिवक्ता.;

श्री. शिवम सिंग, अधिवक्ता.;

श्री. मनीष कुमार, अधिवक्ता.;

श्री. अभिनव सिंग, अधिवक्ता.;

श्री. दीप प्रभू, अधिवक्ता.;

कु. शास्वती पारही, अधिवक्ता.;

श्री. अवि श्रीवास्तव, अधिवक्ता.;

श्री. गोपाल सिंग, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

श्री. अमित कुमार सिंग, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

श्रीमती के. एनाटोली सेमा, अधिवक्ता.;

कु. चुबालेमला चांग, अधिवक्ता.;

श्री. प्रांग न्यूमाई, अधिवक्ता.;

कु. अनिंदिता मित्रा, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

श्री. यशपाल ढींगरा, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

श्री. राजीव रंजन द्विवेदी, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

श्री. निखिल गोयल, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

कु. नवीन गोयल, अधिवक्ता.;

श्री. आदित्य कोशी रॉय, अधिवक्ता.;

श्री. व्ही. के. कन्ना, अधिवक्ता.;

श्री. हितेश कुमार शर्मा, अधिवक्ता.;

श्री. अखिलेश्वर झा, अधिवक्ता.;

श्री. एस. के. राजोरा, अधिवक्ता.;

श्री. अमित कुमार चावला, अधिवक्ता.;

डॉ. (श्रीमती) विपिन गुप्ता, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

श्री. नकुल दीवान, वरिष्ठ अधिवक्ता;

श्री. प्रद्युम्न गोहिल, अधिवक्ता.;

श्रीमती तरुणा सिंग गोहिल, अभिलेखावर नियुक अधिवक्ता;

कु. रानू पुरोहित, अधिवक्ता.;

श्री. अलापती साहित्य कृष्ण, अधिवक्ता.;

कु. नूरिन सरना, अधिवक्ता.;

श्री. नील चॅटर्जी, अधिवक्ता.;

श्री. अमित के. नैन, अभिलेखावर नियुक अधिवक्ता

श्री. पी. आय. जोस, अभिलेखावर नियुक अधिवक्ता

कु. भावना दास, अभिलेखावर नियुक अधिवक्ता

न्यायालयाचा निर्णय यांच्याद्वारे देण्यात आला

रस्तोगी, न्यायमूर्ति .:-

दिवाणी अर्ज क्रमांक. ५३५२-५३५३/२००७

१. विशेष परवानगीद्वारे केलेल्या सदरच्या अपीलांमध्ये राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाने (यापुढे "राष्ट्रीय आयोग") दिनांक ३ डिसेंबर २००४ रोजी दिलेल्या निर्णय आणि आदेशावर हल्ला (आव्हान) करण्यात आला आहे, ज्यामध्ये राष्ट्रीय आयोगाने गुजरात राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाचा (यापुढे "राज्य आयोग") उपभोक्ता संरक्षण अधिनियम, १९८६ (यापुढे "अधिनियम, १९८६") अंतर्गत उत्तरवादीच्या सांगण्यावरून दाखल केलेल्या तक्रारीची दाखलयोग्यते बाबतचा निष्कर्ष उलटवताना असे म्हटले आहे की जी व्यक्ती कल्पित जोखीम भरून काढण्यासाठी विमा पॉलिसी घेते ती व्यक्ती व्यापारी प्रयोजनासाठी पॉलिसी घेत नाही. पॉलिसी हि केवळ प्रत्यक्ष नुकसानीची क्षतिपूर्ती करण्याकरिता असून नफा कमविण्याच्या उद्देशाने नसते. शेवटी असे म्हटले आहे की उत्तरवादी (विमाधारक) हा १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २(१)(डी) अंतर्गत परिभाषित केल्यानुसार उपभोक्ता असून त्याच्या सांगण्यावरून दाखल केलेली तक्रार दाखल करण्यायोग्य होती आणि राज्य

आयोगाद्वारे त्याची तपासणी गुणवत्तेनुसार करण्यात यावी.

२. उत्तरवादी क्र. १ (टाटा वाहनांचे विक्रेते) असून उत्तरवादी क्र. २ हे दावेदार आहेत. उत्तरवादी क्र. १ ने अपीलकर्त्याकडून रु.७५,३८,०००/-च्या आणि उत्तरवादी क्र. २ कडे रु. ९० लाख च्या संरक्षणासाठी अग्निविमा पॉलिसी काढली होती. दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी उत्तरवादी क्र. १ आणि २ यांच्या मालाचे आगीमुळे (गोध्रा दंगलीदरम्यान) नुकसान झाले. अपीलकर्त्याने उत्तरवादी क्र. २ चा रु. ५४,२९,८७१/- पर्यंतचा दावा मान्य करताना उत्तरवादी क्र.१ चा दावा फेटाळला. उत्तरवादींनी राज्य आयोगाकडे तक्रार दाखल केली.

३. उत्तरवादी क्र. १ मे. हर्सोलिया मोटर्स, या वाहनांच्या विक्रीच्या व्यवसायात गुंतलेल्या व्यावसायिक संस्थेने अपीलकर्त्याच्या विमा कंपनीकडून कार्यालय, शोरूम, गॅरेज, शोरूम परिसरात असलेली यंत्रसामग्री इत्यादींचा समावेश असलेली अग्नि विमा पॉलिसी घेतली होती. दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी गोध्रा दंगलीदरम्यान त्यांच्या वरील परिसराचे नुकसान झाले अशी उत्तरवादीची तक्रार होती. दि. २७ फेब्रुवारी २००२ रोजी झालेल्या गोध्रा घटनेनंतर दंगली उसळल्या, परिणामी दि. २८ फेब्रुवारी २००२ रोजी दंगलखोरांनी लावलेल्या आगीत तक्रारदाराचा माल नष्ट झाला आणि उत्तरवादी /तक्रारदार हे विमा पॉलिसी अंतर्गत विमा उतरवलेल्या रकमेची भरपाई मिळण्याचा हक्कदार होते या आधारावर नुकसानभरपाई मिळावी यासाठी उत्तरवादी मेसर्स हर्सोलिया मोटर्स या भागीदारी कंपनीने राज्य आयोगासमोर तक्रार दाखल केली होती.

४. राज्य आयोगाने असे म्हटले आहे की उत्तरवादी १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २ (१) (डी) अंतर्गत परिभाषित केल्यानुसार 'उपभोक्ता' या शब्दप्रयोगाखाली येत नाही आणि असे म्हटले आहे की तक्रारदार ही नफा कमावण्यासाठी व्यवसाय परिसरातून व्यवसाय चालवणारी कंपनी असल्याने ती 'व्यापारी प्रयोजनासाठी' या संज्ञेखाली येते आणि म्हणून १९८६ च्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार हि तक्रार चालविण्या योग्य नाही.

५. राष्ट्रीय आयोगासमोर, विमाधारक उत्तरवादिने दाखल केलेल्या अपीला मध्ये, व्यावसायिक संस्थेने घेतलेल्या विमा पॉलिसी ह्या व्यावसायिक हेतूसाठी सेवा भाड्याने

घेण्याकरिता घेतल्या आहेत असे मानले जाऊ शकते का आणि १९८६ च्या अधिनियमाच्या तरतुदींचा आणि कलम २(१)(डी) आणि २(१)(ओ) अंतर्गत परिभाषित केलेल्या "उपभोक्ता" आणि "सेवा" या संज्ञांच्या व्याख्येचा फेरविचार केल्यानंतर १९८६ च्या अधिनियमाच्या तरतुदींमधून वगळले जाऊ शकते का असा प्रश्न उपस्थित झाला आयोगाने असा निष्कर्ष नोंदवला की "कोणत्याही व्यापारी प्रयोजनासाठी " या वापरण्यात आलेल्या शब्दप्रयोगाचा अर्थ असा होईल की खरेदी केलेल्या वस्तू किंवा भाड्याने घेतलेल्या सेवांचा वापर थेट नफा कमावण्याच्या उद्देशाने कोणत्याही कार्यात केला पाहिजे आणि नफा कमविणे हा व्यापारी प्रयोजनाचा मुख्य उद्देश आहे, परंतु ज्या प्रकरणात खरेदी केलेल्या वस्तू किंवा भाड्याने घेतलेल्या सेवा, नफा न मिळविण्याच्या हेतूने करण्यात येणाऱ्या कृतींकरीता वापरण्यात येत असतील तर त्या बाबतीत ते व्यापारी प्रयोजन नसेल आणि म्हणून असे मत व्यक्त केले कि, वास्तविक झालेल्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी, कल्पित जोखीम भरून काढण्यासाठी विमा पॉलिसी घेणारी व्यक्ती सामान्यतः नफा कमावण्याचा हेतू ठेवत नाही आणि त्यानुसार असे म्हटले गेले की उत्तरवादी /तक्रारदार हा १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २(१)(डी) अंतर्गत 'उपभोक्ता' आहे आणि त्याच्या सांगण्यावरून दाखल केलेल्या तक्रारीची, जी अपीलकर्ती विमा कंपनीच्या सांगण्यावरून या न्यायालयासमक्ष दाखल करण्यात आलेल्या अपील मधील आव्हानात्मक विषय असून त्याची राज्य आयोगाने दि. ३ डिसेंबर २००४ रोजी दिलेल्या आक्षेपित न्यायनिर्णयाच्या अंतर्गत त्याच्या योग्यतेनुसार तपासणी करावी /निकाली लावण्यात यावी.

६. या न्यायालयाने दि. १५ एप्रिल २००५ रोजी नोटीस बजावली होती, परंतु या निकालाच्या अंमलबजावणीला आणि परिणामाला स्थगिती देण्यात आली होती. परिणामी, उत्तरवादीच्या सांगण्यावरून दाखल केलेल्या तक्रारीची राज्य आयोगाने अजूनपर्यंत योग्यतेनुसार तपासणी केलेली नाही.

७. राष्ट्रीय आयोगाच्या न्यायनिर्णयामुळे निर्माण झालेल्या दिवाणी अपील क्र. ५३५२-५३५३/२००७ (नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड -विरुद्ध- हर्सोलिया मोटर्स) सह सुनावणी करण्यात आलेल्या अपीलांच्या इतर तुकड्या ज्यामध्ये दि. ३ डिसेंबर २००४ रोजीच्या

आक्षेपित न्यायनिर्णयाचा आधार घेत, तीच तत्त्वे लागू केल्याने, अपीलकर्ता विमाधारकाच्या सांगण्यावरून आमच्या समक्ष त्यांना आव्हान देण्यात आले आहे.

८. आमच्या विचारार्थ उद्भवणारा मूलभूत मुद्दा असा आहे की, विमाधारक उत्तरवादीने (व्यावसायिक उद्योगांनी) घेतलेली विमा पॉलिसी हि 'व्यापारी प्रयोजनासाठी ' सेवा भाड्याने घेण्याकरिता संरक्षण देणार का, ज्यामुळे १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २(१)(डी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे 'उपभोक्ता ' या शब्दाच्या कक्षेतून त्यास वगळण्यात आले आहे.

९. अपीलकर्त्याचे विद्वान अधिवकता असे सादर करतात की सर्व विमा बाबींचा १९८६ च्या अधिनियमाच्या कक्षेत संपूर्ण समावेश केला जाऊ शकत नाही आणि जर ते दर्शनी मूल्याने घेतले जात असेल तर ते व्यावसायिक न्यायालय अधिनियम, २०१५ (यापुढे "अधिनियम २०१५") च्या तरतुदींना निरर्थक ठरवतील आणि पुढे सादर करतात की अधिनियम २०१५ च्या कलम २(१)(XX) अंतर्गत व्यावसायिक विवादांच्या कक्षेत विमा आणि पुनर्विमा समाविष्ट आहेत.

१०. विद्वान अधिवक्ता पुढे असे सादर करतात की लक्ष्मी इंजिनिअरिंग वर्क्स -विरुद्ध-. पी. एस. जी. इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूट [१] या प्रकरणात या न्यायालयाने या विषयावरील कायद्याची तपासणी केली आहे आणि असे सांगितल्या गेले आहे की "व्यापारी प्रयोजन" पाहण्यासाठी प्रत्येक प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थिती विचारात घेऊन ज्या उद्देशासाठी वस्तू आणि सेवा या खरेदी केल्या जातात किंवा मिळवल्या जातात त्या उद्देशाचा विचार करायला पाहिजे. नफा कमविण्याच्या हेतुने मोठ्या प्रमाणात व्यावसायिक उपक्रम राबवण्याच्या दृष्टीने त्याचा वापर केला गेला तर खरेदीदार ग्राहक म्हणून पात्र ठरणार नाही आणि १९८६ चे अधिनियम देखील लागू होणार नाही आणि या न्यायालयाच्या मताला नंतरच्या निकालांमध्ये सातत्याने पुष्टी देण्यात आली आहे.

११. विद्वान अधिवक्ता पुढे असे सादर करतात की आयोगाने आपल्या शेवटून दुसऱ्या परिच्छेदात स्पष्टपणे विमा पॉलिसी ला १९८६ च्या अधिनियमाच्या कक्षेत घेतले असून त्याच्या उत्तरवर्तीमध्ये, व्यवहाराच्या स्वरूपाची पर्वा न करता, जेव्हा जेव्हा विम्याच्या पॉलिसीच्या

संदर्भात नुकसानभरपाईसाठी दावा केला जातो, तेव्हा अशा तक्रारी १९८६ च्या अधिनियमा अंतर्गत कायम राखण्यायोग्य ठरतात.

१२. विद्वान अधिवक्ता पुढे असे सादर करतात की, व्यावसायिक संस्थांकडून विमा करार मिळवण्याचा प्रमुख उद्देश नफा कमावणे हा असतो आणि त्यामुळे त्याचा त्याच्याशी जवळचा आणि थेट संबंध असतो आणि त्यानुसार या संस्थांना ग्राहक न्यायालयासमोर संक्षिप्त कार्यवाहीसाठी दावा दाखल करण्याचा अधिकार नाही आणि सदरचा वाद वैयक्तिक वापरासाठी मोबाईल गमावल्याबद्दल विम्याचा दावा मागणाऱ्या छोट्या असंतुष्ट ग्राहकाचे नाहीत, किंवा सदोष इंजिन दुरुस्त करण्यासाठी झालेल्या खर्चाचा दावा मागणाऱ्या ऑटोरिक्षा चालकाचे नाहीत, कारण ते त्याच्या उपजीविकेसाठी समाविष्ट आहे. हा प्रस्तुत वाद मोठ्या व्यावसायिक संस्थांचा व्यवसाय चालवण्यासंबंधी जोखीमांचे संरक्षण करण्यासाठी विमा कंपन्यांसोबत करण्यात येणाऱ्या व्यावसायिक कराराशी संबंधित आहे. जर त्यांना १९८६ च्या अधिनियमा अंतर्गत उपभोक्ता म्हणून अधिकारक्षेत्र वापरण्याची परवानगी दिली जात असेल, तर ज्या विधिमंडळाच्या विवेकबुद्धीनुसार हा अधिनियम लागू करण्यात आला आहे, त्याच विधिमंडळाच्या आदेशाला यामुळे धक्का बसेल.

१३. विद्वान अधिवक्ता पुढे असे सादर करतात की, १९८६ च्या अधिनियमा च्या कलम २(१)(डी) आणि ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ चे कलम २(७) अंतर्गत विमा करारामुळे व्यथित झालेल्या फिर्यादीसाठी निवडणुकीचा सिद्धांत उपलब्ध नसल्याने विशेषतः ग्राहक न्यायालयांच्या कक्षेतून "व्यापारी प्रयोजनासाठी सेवांच्या तरतुदी वगळल्या आहेत आणि २०१५ च्या अधिनियमा अंतर्गत फक्त व्यावसायिक न्यायालयाकडेच उपाय उपलब्ध आहे.

१४. विद्वान अधिवक्ता असे सादर करतात की, १९८६ च्या अधिनियमाच्या कक्षेत येणाऱ्या व्यावसायिक उपक्रमांसाठी विम्याच्या विरुद्ध असलेला युक्तिवाद जर स्वीकारायचा असेल, तर व्यावसायिक उपक्रमांसाठी नफा निर्माण करण्यासाठी कोणत्याही व्यावसायिक कृतींसाठी कोणतीही सेवा मिळवणे हे १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २(१)(डी) अंतर्गत परिभाषित केलेल्या 'उपभोक्ता' या संज्ञेमध्ये येईल आणि ते असंभवनीयतेस कारणीभूत ठरेल कारण ते व्यावसायिक हेतूंसाठी वापरल्या जाणाऱ्या सेवेच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात जाईल, ज्याचे

उल्लंघन नागरी कारवाईला जन्म देते, ग्राहक निवारणाला नाही.

१५. विद्वान अधिवक्ता पुढे सादर करतात की जर उत्तरवादीने अधिनियमाच्या अर्थांतर्गत कोणत्याही व्यक्तीने घेतलेला विमा, सेवा म्हणून सादर करणे स्वीकारले तर यामुळे देशभरातील ग्राहकांच्या विवादांमध्ये झपाट्याने वाढ होईल, ज्यामुळे केवळ सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर कायद्याची शाब्दिक भावना आणि हेतू निराश होईल असे नाही, तर ते अनवधानाने विमा कंपनीने आकारलेल्या हप्त्यांचा मुद्दा उपस्थित करतो जे पुन्हा कायद्याच्या एकूण हेतूला उपकारक होईल, कारण नियमितपणे सेवांचा लाभ घेणाऱ्या खऱ्या ग्राहकांना त्याच सुरक्षिततेसाठी अधिक पैसे मोजावे लागतील आणि २००२ मध्ये दुरुस्ती करण्याच्या उद्देशाने लक्षात ठेवलेल्या उद्दिष्टे आणि कारणांच्या विधानावरून याची नोंद घेतली जाऊ शकते.

१६. सरतेशेवटी, विद्वान अधिवक्ता असे सादर करतात की विमा पॉलिसीच्या खरेदीचा थेट संबंध मोठ्या प्रमाणावरील उद्योगातील व्यावसायिक कृतींशी आहे. दुसऱ्या शब्दांत, विमा पॉलिसी कंपनीला आग, भूकंप किंवा इतर कोणत्याही विमा जोखीमांमुळे होणाऱ्या नुकसानाची भरपाई देते. विमा कंपनी ज्याची परतफेड करते तो म्हणजे तोटा आणि तोटा थेट कंपनीच्या व्यापाराशी जोडलेला आहे आणि म्हणूनच, नुकसानाची परतफेड करण्याची मागणी करणारी तक्रार ग्राहक न्यायालयासमोर चालविण्यायोग्य नाही, जर ती येथे उत्तरवादीसारख्या मोठ्या व्यावसायिक संस्थेने दाखल केली असेल आणि राष्ट्रीय आयोगाने १९८६ च्या अधिनियमाच्या तरतुदींचा संबोधित केलेला अर्थ केवळ या न्यायालयाच्या निकालांच्या विरोधात नाही, तर तो कायदेशीररित्या टिकण्याजोगा नसून, या न्यायालयाद्वारे हस्तक्षेप करण्यास पात्र आहे.

१७. उलटपक्षी उत्तरवादीच्या विद्वान अधिवक्तांनी असे सादर केले की विमा पॉलिसी संरक्षण खरेदी हा विशिष्ट जोखमीच्या नुकसानभरपाईचा करार असून अशा कृतीतून नफा/तोटा मिळवण्यासाठी काहीतरी करण्याचा किंवा न करण्याचा करार नाही. जर आग, पूर इ. सारख्या विशिष्ट परिस्थितीमुळे विचारात घेतलेली जोखीम उद्भवली नाही, तर पॉलिसी संरक्षणाचे नगदीकरण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही आणि असे झाल्यास जे काही देय

असेल ती आगाऊ भरलेल्या हप्त्यांमधील जोखीम रक्कम असेल. अशा परिस्थितीत, विमा पॉलिसी संरक्षण मुळात नफा कमावण्यासाठी देण्यात येत नाही / खरेदी करण्यात येत नसून आकस्मिक जोखीम भरून काढण्यासाठी दिले जात असते, त्यामुळे विमा संरक्षण जरी व्यावसायिक उपक्रमांनी खरेदी केले असले तरी ते व्यापारी प्रयोजनासाठी खरेदी केले जात नाही आणि व्यापारी प्रयोजन काय आहे हे केवळ अनेक शब्दकोशांमध्येच नव्हे तर या न्यायालयाच्या निकालांमध्ये देखील चांगल्या प्रकारे परिभाषित करण्यात आलेले आहे आणि असे म्हटले आहे की हे लक्षात येऊ शकते की १९८६ चा अधिनियम केवळ "व्यापारी प्रयोजन" यासाठी व्यवहार करण्यास प्रतिबंधित करतो परंतु तो कोणत्याही व्यावसायिक उद्योगाला ग्राहक होण्यास मनाई करत नाही आणि म्हणूनच व्यावसायिक उपक्रम खरेदीदार/ग्राहक असू शकतो आणि उपभोक्ता म्हणून त्याचे अधिकार गाजवू शकतो, या अटीवर की अशा व्यवहारातून नफा मिळवणे हा तात्कळ हेतू असेल असे या न्यायालयाने मदन कुमार सिंग (मृत) कायदेशीर वारसदारां द्वारा -विरुद्ध- जिल्हा दंडाधिकारी [३] या प्रकरणाच्या माध्यमातून नमूद केले आहे.

१८. विद्वान अधिवक्ता पुढे असे सादर करतात की नफा कमावण्याच्या तात्काळ हेतूशिवाय व्यावसायिक उपक्रमांनी केलेला कोणताही व्यवहार 'व्यापारी प्रयोजन' साठी मानला जाऊ शकत नाही, अन्यथा व्यावसायिक उपक्रमांद्वारे केलेले सर्व व्यवहार ज्यांचा नफा कमावण्याचा अगदी दूरचा सह-संबंध देखील कदाचित असू शकतो किंवा असू शकत नाही, ते व्यापारी प्रयोजनासाठी आहेत असे मानले जातील. उदाहरणार्थ, एखाद्या कंपनीने आपल्या कामगारांसाठी किंवा कोणत्याही अनोळखी व्यक्तीला/बाहेरील व्यक्तीला मोफत पाणी पुरवण्यासाठी वॉटर प्लांट किंवा भिंतींच्या उन्नतीकरणासाठी मोठ्या प्रमाणात रंगाचे डब्बे खरेदी केल्यास, इ. त्याचा नफा कमावण्यावर थेट परिणाम होत नाही. अशा प्रकारे, वॉटर प्लांट खरेदी करणे व्यापारी प्रायोजना साठी आहे असे मानले जाऊ शकत नाही, अन्यथा व्यावसायिक उपक्रमांद्वारे अक्षरशः सर्व व्यवहारांना व्यापारी प्रायोजनाचा रंग मिळेल आणि विधिमंडळाचा असा हेतू असता तर त्यांनी 'उपभोक्ता' या शब्दाची व्याख्या वेगळ्या प्रकारे लिहिली असती - 'कोणतीही व्यक्ती' ऐवजी 'व्यावसायिक उपक्रमांव्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती' असे वापरले असते, परंतु कायद्याने त्याच्या विवेकबुद्धीने व्यापारी प्रायोजनाने

वाणिज्य व्यवहार समाविष्ट करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे व्यावसायिक उद्योगांनी केलेले व्यवहार हे १९८६ च्या अधिनियम अंतर्गत पूर्णपणे वगळलेले मानले जाऊ शकत नाहीत.

१९. आम्ही पक्षकारांच्या विद्वान अधिवक्तांचे म्हणणे ऐकले आहेत आणि त्यांच्या मदतीने अभिलेखावरील उपलब्ध असलेल्या साहित्याचा अभ्यास केला आहे.

२०. आमच्या विचारार्थ उपस्थित केलेल्या मुद्द्याचे परीक्षण करण्यापूर्वी, १९८६ च्या अधिनियमाकडे बारकाईने पाहणे योग्य ठरेल.

२१. १९८६ चा अधिनियम हा सामाजिक लाभ-केंद्रित कायदा आहे आणि म्हणूनच, कायद्यातील तरतुदींचा अर्थ लावताना न्यायालयाला रचनात्मक उदारमतवादी दृष्टीकोन स्वीकारावा लागेल. कायद्याचा हेतू निश्चित करण्यासाठी उपयुक्त सहाय्य देऊ शकणाऱ्या १९८६ च्या अधिनियमाच्या प्रस्तावनेपासून सुरुवात केल्यास, ग्राहकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी अधिनियमीत करण्यात आले. "संरक्षण" या शब्दाचा वापर हा कायद्याच्या निर्मात्यांच्या मनाची गुरुकिल्ली आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याचा विस्तृतपणे प्रयत्न करणाऱ्या विविध व्याख्या आणि तरतुदींचा, प्रस्तावनेद्वारे तरतुदीचा साधा अर्थ नियंत्रित केला जाऊ शकत नाही अशा निश्चित केलेल्या कायद्यापासून दूर न जाता या दृष्टीकोनातून अर्थ लावला गेला पाहिजे.

२२. खरे तर, सामान्य माणसाला अशा चुकीच्या गोष्टींपासून वाचवण्याची दीर्घकाळापासूनची गरज कायद्याने पूर्ण केली आहे, ज्यासाठी विविध कारणांमुळे सामान्य कायद्यांतर्गत उपाय भ्रामक झाले आहेत. राज्याला हस्तक्षेप करण्याची आणि ग्राहकांच्या हितांचे रक्षण करण्याची परवानगी देणारे विविध कायदे आणि नियम हे अनैतिक लोकांसाठी एक आश्रयस्थान बनले आहेत कारण अंमलबजावणी यंत्रणा एकतर हलत नाही किंवा सांगण्याची आवश्यकता नसलेल्या कारणांमुळे ती अप्रभावी आणि अकार्यक्षमपणे चालते.

२३. ग्राहकांना बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेत थेट सहभागी होण्यास सक्षम करून समाजाच्या कल्याणाला चालना देण्यात या कायद्याचे महत्त्व आहे. 'उपभोक्ता ', 'सेवा',

'व्यापारी', 'अनुचित व्यापार प्रथा' यासारख्या विविध व्याख्यांची छाननी केल्यास असे सूचित होते की विधिमंडळाने कायद्याची व्याप्ती वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रत्येक व्याख्या दोन भागांमध्ये आहेत, एक स्पष्टीकरणात्मक आणि दुसरी सर्वसमावेशक. स्पष्टीकरणात्मक किंवा मुख्य भाग स्वतःच अशा गोष्टींचा विस्तार करण्यासाठी त्याच्या व्याप्तीमध्ये त्याचा विस्तृत विस्तार स्पष्टपणे दर्शविणारी व्याप्तीचे वाक्प्रचार वापरतो जे अन्यथा त्याच्या नैसर्गिक गरजेच्या पलीकडे असते.

२४. अशा प्रकारे १९८६ च्या अधिनियमाच्या तरतुदींचा अर्थ अधिनियमाचा उद्देश साध्य करण्यासाठी ग्राहकाच्या बाजूने लावण्यात आला पाहिजे कारण तो एक सामाजिक लाभ-केंद्रित कायदा आहे. अशा कायद्याच्या तरतुदींचा अर्थ लावताना न्यायालय/आयोगाचे प्राथमिक कर्तव्य म्हणजे ते तरतुदींच्या भाषेशी हिंसा न करता आणि अधिनियमाच्या उद्देशाच्या विरोधात न जाता या अधीन राहून रचनात्मक दृष्टीकोनाचा स्वीकार करावा.

२५. कलम २(१)(डी) "उपभोक्ता " ची व्याख्या करते, कलम २(१)(एम) "व्यक्ती" ची व्याख्या करते आणि कलम २(१)(ओ) "सेवा" ची व्याख्या करते, जे आमच्या विचारार्थ उपस्थित केलेल्या विवाद्य प्रश्नाचे परीक्षण करण्यासाठी आवश्यक आहेत, त्या खाली पुनरुत्पादित करण्यात आल्या आहेत:

"२. व्याख्या.- या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,-

....

(ध) "उपभोक्ता" याचा अर्थ, पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती, असा आहे -

(एक) प्रदान करण्यात आलेल्या व वचन देण्यात आलेल्या अथवा अंशतः प्रदान करण्यात आलेल्या आणि अंशतः वचन देण्यात आलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात अथवा आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही पद्धतीखाली जी कोणताही माल खरेदी करते आणि त्यामध्ये प्रदान करण्यात आलेल्या किंवा वचन देण्यात आलेल्या अथवा अंशतः प्रदान करण्यात आलेल्या व अंशतः वचन देण्यात आलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात असा माल जिने खरेदी केला असेल त्या व्यक्ती व्यतिरिक्त अशा मालाचा उपयोग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा किंवा जेव्हा असा उपयोग अशा व्यक्तीच्या मान्यतेने करण्यात येत असेल त्यावेळी आस्थगित प्रदानाच्या

कोणत्याही पद्धतीखाली अशा मालाची खरेदी करणाऱ्या व्यक्तीचा समावेश आहे. परंतु, जी व्यक्ती असा माल पुनर्विक्रीसाठी किंवा कोणत्याही व्यापारी प्रयोजनासाठी मिळविलं तिचा त्यामध्ये समावेश होत नाही; अथवा

(दोन) प्रदान करण्यात आलेल्या व वचन देण्यात आलेल्या अथवा अंशतः प्रदान केलेल्या आणि अंशतः वचन दिलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात अथवा आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही पद्धतीखाली जी, कोणताही सेवा भाड्याने घेते ती व्यक्ती आणि त्यामध्ये प्रदान केलेल्या किंवा वचन दिलेल्या अथवा अंशतः प्रदान केलेल्या व अंशतः वचन दिलेल्या प्रतिफलाच्या मोबदल्यात जिने, त्या सेवा भाड्याने घेतल्या असतील त्या व्यक्तीव्यतिरिक्त अशा सेवांच्या कोणत्याही लाभाधिकाऱ्याचा किंवा जेव्हा अशा सेवांचा लाभ प्रथमोल्लिखीत व्यक्तीच्या मान्यतेने घेण्यात येत असेल त्यावेळी आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही पद्धतीखाली अशा सेवा भाड्याने घेणाऱ्या व्यक्तीचा समावेश आहे;

स्पष्टीकरणः उपखंड (i) करिता, ग्राहकाने खरेदी केलेल्या आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून केवळ स्वतःचा उदरनिर्वाह करण्याच्या उद्देशाने वस्तूंचा वापर करणे, याचा 'व्यापारी प्रयोजन' मध्ये समावेश नाही.

....

(ड) "व्यक्ती" यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे-

(एक) एखादी पेढी-मग ती नोंदणीकृत असो किंवा नसो;

(दोन) एखादे हिंदू अविभक्त कुटुंब;

(तीन) एखादी सहकारी सोसायटी;

(चार) व्यक्तींचा अन्य प्रत्येक अधिसंघ- मग तो सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) अन्वये नोंदलेला असो किंवा नसो;

(ण) "सेवा" याचा अर्थ, संभाव्य उपयोगकर्त्याला उपलब्ध करून दिली जाणारी कोणत्याही वर्णनाची सेवा असा असून त्यामध्ये बँकव्यवसाय, वित्तपुरवठा, विमा, परिवहन, संस्करण, विद्युत किंवा इतर ऊर्जेचा पुरवठा, भोजन किंवा निवास किंवा दोन्ही, [गृहनिर्माण], करमणूक, मनोरंजन किंवा एखादी बातमी वा अन्य माहिती पुरविण्याची सोय करणे याचा समावेश आहे, परंतु कोणतीही सेवा विनामूल्य किंवा वैयक्तिक सेवेच्या संविदेखाली करण्याचा त्यात समावेश होत नाही."

२६. ग्राहक हा शब्द या कायद्याचा गाभा आहे. हा कायदा वस्तूंमधील दोष किंवा सेवेतील कोणत्याही कमतरतेच्या दुहेरी संकल्पनांवर अवलंबून असल्याने, ग्राहक म्हणजे जो कोणतीही वस्तू खरेदी करतो किंवा कोणतीही सेवा भाड्याने घेतो. अशा प्रकारे, 'ग्राहक' या शब्दाची व्याख्या अशी केली गेली आहे की जी व्यक्ती -

(ए) खरेदीदार, किंवा

(बी) संबंधित वस्तूच्या खरेदीदार, वापरकर्त्याच्या संमतीने, किंवा

(सी) भाडेकरू किंवा अन्यथा लाभ घेणारी व्यक्ती, किंवा

(डी) उपरोक्त व्यक्तींच्या संमतीने, संबंधित सेवा किंवा सेवांचा लाभार्थी

२७. वस्तूची अशी खरेदी करणे किंवा अशा कोणत्याही सेवेचा लाभ घेणे अथवा भाड्याने घेणे हे विचारार्थ आहे, या अटीसह,-

(i) पैसे देणे, किंवा

(ii) वचनबद्ध, किंवा

(iii) अंशतः अदा केलेले किंवा वचन दिलेले, किंवा

(iv) आस्थगित प्रदानाच्या कोणत्याही प्रणालीच्या अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले.

२८. तथापि, अशा प्रकारे परिभाषित केलेल्या "ग्राहक" या शब्दामध्ये अशा व्यक्तीचा समावेश नाही, जी वस्तूच्या बाबतीत अशा वस्तू पुनर्विक्रीसाठी किंवा कोणत्याही व्यावसायिक हेतूसाठी मिळवते किंवा जी सेवेच्या बाबतीत कोणत्याही व्यावसायिक हेतूसाठी अशा सेवांचा लाभ घेते. वरील व्याख्येशी जोडलेल्या स्पष्टीकरणात असे म्हटले आहे की "व्यापारी प्रयोजन " या शब्दप्रयोगामध्ये अशा वस्तूंचा खरेदीदार किंवा अशा सेवा किंवा सेवांचा लाभ घेणारी व्यक्ती केवळ स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आपला उदरनिर्वाह कमावण्याच्या उद्देशाने वापरत नाही.

२९. हे लक्षात येऊ शकते की कलम २(१)(एम) "व्यक्ती" ची व्याख्या करते आणि त्यात नोंदणीकृत असो वा नसो, मोठ्या किंवा लहान अशा कोणत्याही भेदाविना इतर श्रेणींव्यतिरिक्त, पिढीचा समावेश आहे. म्हणून, कलम २(१)(ओ) अंतर्गत परिभाषित केलेल्या "सेवा" मध्ये बँकिंग, विमा आणि बँकिंग/विमा इत्यादींच्या बाबतीत सेवेमध्ये त्रुटी असल्यास, तो कलम २(१)(डी) अंतर्गत ग्राहक आहे या वस्तुस्थितीच्या अधीन राहून, अशा ग्राहकाला १९८६ च्या अधिनियमाच्या अधिकारक्षेत्राचा अवलंब करण्यासाठी उपाय नेहमीच उपलब्ध असतो.

३०. लखनौ डेव्हलोपमेंट ऑथॉरिटी -विरुद्ध- एम. के. गुप्ता [३] या खटल्यातील कायद्याच्या संदर्भात असलेल्या व्याख्येचे विश्लेषण करत, या न्यायालयाने कायद्यांतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे 'ग्राहक' या संकल्पने संबंधात निर्देश दिले :

"३....ते दोन भागांमध्ये आहे. पहिला भाग वस्तूंशी आणि दुसरा सेवांशी संबंधित आहे. दोन्ही भाग प्रथम व्यापक शब्द प्रयोगांचा वापर करून वस्तू आणि सेवांचा अर्थ जाहीर करतात. सर्वसमावेशक खंडाच्या वापराने त्यांची व्याप्ती आणखी वाढविण्यात आली आहे. उदाहरणार्थ, केवळ वस्तूंचा खरेदीदार किंवा सेवांचा भाडेकरूच नव्हे तर जे वस्तू वापरतात किंवा ज्यांनी वस्तू खरेदी केली आहे किंवा ज्यांनी सेवा भाड्याने घेतल्या आहेत अशा व्यक्तीच्या संमतीने सेवांचे जे लाभार्थी आहेत त्यांचा देखील त्यात समावेश आहे.

विधिमंडळाने केवळ 'फिर्याद', 'फिर्यादी', 'उपभोक्ता' यांची व्याख्या करण्यासाठीच नव्हे तर अनुचित व्यापार प्रथा म्हणजे काय याचा तपशीलवार उल्लेख करण्यासाठी खंड (आर) मध्ये देखील विस्तृत व्याख्या देऊन खबरदारी घेतली आहे तसेच खंड (एफ) आणि (जी) द्वारे 'दोष' आणि 'वैगुण्य' ची व्याख्या देखील देण्यात आली आहे, ज्यासाठी ग्राहक आयोगाकडे जाऊ शकतो. अशा प्रकारे, वस्तूंचा खरेदीदार म्हणून आणि सेवांचा वापर करणारा या अर्थाने, व्यावसायिक दृष्टीने समजल्या जाणाऱ्या ग्राहकांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करणे हा या कायद्याचा उद्देश आहे. वस्तू आणि सेवांचे सामान्य वैशिष्ट्ये अशी आहेत की खर्च भागविण्यासाठी आणि वस्तू विकणाऱ्या किंवा सेवा पुरविणाऱ्यासाठी नफा किंवा उत्पन्न निर्माण करण्यासाठी, एका विशिष्ट किंमतीला पुरविल्या जातात. परंतु एकातील दोष आणि दुसऱ्यातील त्रुटी दूर करावी लागेल आणि त्याची भरपाई वेगळ्या पद्धतीने करावी लागेल. पहिल्याच्या बाबतीत, सामान्यतः, बदलून देणे आणि दुरुस्ती करून देणे शक्य आहे, तर दुसऱ्याला नुकसानाचे योग्य समतुल्य मूल्य किंवा नुकसान भरपाई देणे आवश्यक असू शकते.

३१. नंतर, लक्ष्मी इंजिनिअरिंग वर्क्स (वर उल्लेखित) मध्ये या न्यायालयाने, सुधारणा न केलेल्या स्वरूपात 'उपभोक्ता' या शब्दाचा गर्भित विस्तार आणि दुरुस्तीद्वारे 'उपभोक्ता' या शब्दामध्ये जोडण्यात आलेल्या स्पष्टीकरणावर विचार करताना, सदरचे स्पष्टीकरण स्पष्टीकरणात्मक स्वरूपाचे आहे असा निर्णय दिला आणि दुरुस्ती अधिनियम, १९९३ द्वारे जोडण्यात आलेल्या स्पष्टीकरणाची दखल घेत, 'उपभोक्ता' या शब्दाच्या व्याख्येचे खालीलप्रमाणे विस्तृत परीक्षण केलेः

"११. आता कलम २ (डी) मधील 'उपभोक्ता' या संज्ञेकडे परत येताना, ग्राहक म्हणजे या याचिकेच्या उद्देशासाठी संबंधित असेल त्याप्रमाणे (i) प्रतिफळाच्या मोबदल्यात कोणतीही वस्तू खरेदी करणारी व्यक्ती; मोबदला दिला गेला आहे किंवा मोबदला दिल्याचे वचन दिले गेले आहे किंवा अंशतः दिले गेले आहे आणि अंशतः वचन दिले गेले आहे की नाही, किंवा मोबदल्याचा भरणा पुढे ढकलला गेला आहे की नाही हे महत्त्वाचे नाही; (ii) ज्या व्यक्तीने अशा वस्तू मोबदला देऊन खरेदी करणाऱ्या व्यक्तीच्या संमतीने अशा वस्तू वापरल्या आहेत; (iii) परंतु त्यात अशा वस्तू पुनर्विक्रीसाठी किंवा कोणत्याही व्यावसायिक हेतूसाठी खरेदी

करणाऱ्या व्यक्तीचा समावेश नाही. 'पुनर्विक्री' हा शब्दप्रयोग पुरेसा स्पष्ट आहे. मात्र, 'व्यापारी प्रयोजन' या शब्दाच्या अर्थाबाबत वाद निर्माण झाला आहे. कायद्यातही त्याची व्याख्या केलेली नाही. व्याख्येच्या अनुपस्थितीत, आपल्याला त्याचा सामान्य अर्थ लक्षात घ्यावा लागेल. 'व्यावसायिक' म्हणजे 'वाणिज्याशी संबंधित'(चेंबरचा विसाव्या शतकातील शब्दकोश); याचा अर्थ 'वाणिज्याशी जोडलेला किंवा त्यात गुंतलेला; व्यापारी; ज्याचा मुख्य उद्देश नफा मिळवणे असतो' (कॉलिन्स इंग्रजी शब्दकोश) तर 'वाणिज्य' या शब्दाचा अर्थ 'आर्थिक व्यवहार, विशेषतः मोठ्या प्रमाणात व्यापारी मालाची खरेदी आणि विक्री' (संक्षिप्त ऑक्सफर्ड शब्दकोश) असा होतो. जर एखादी व्यक्ती "नफा कमावण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावर कोणताही व्यवसाय करण्यासाठी अशा वस्तूंचा वापर करण्याच्या दृष्टीने" वस्तू खरेदी करत असेल तर तो कायद्याच्या कलम २(डी)(आय) च्या अर्थानुसार 'उपभोक्ता' होणार नाही, असा सातत्यपूर्ण दृष्टिकोण राष्ट्रीय आयोग घेत असल्याचे दिसते. या दृष्टिकोणाची व्यापक पुष्टी करत आणि विशेषतः कोणताही गोंधळ दूर करण्याच्या दृष्टीने-'मोठ्या प्रमाणावर' हा शब्दप्रयोग फार अचूक शब्दप्रयोग नाही-संसदेने हस्तक्षेप करीत अध्यादेश/दुरुस्ती कायदा, १९९३ च्या मधम्याने कलम २(डी)(आय) मध्ये स्पष्टीकरण जोडले आहे. अपवादासाठी अपवाद ची बाब म्हणजे- सदरचे स्पष्टीकरण "व्यापारी प्रयोजन" या शब्दप्रयोगाच्या कार्यक्षेत्रातून काही प्रयोजन वगळते. चला विस्ताराने सांगूयाः जो व्यक्ती टंकलेखन यंत्र किंवा कार खरेदी करतो आणि ती त्याच्या वैयक्तिक वापरासाठी वापरतो तो निश्चितच ग्राहक असतो, परंतु जो व्यक्ती मोबदला करीता इतरांचे टंकलेखनाचे काम करण्यासाठी किंवा कार टॅक्सी म्हणून चालवण्यासाठी टंकलेखन यंत्र किंवा कार खरेदी करतो, ती व्यक्ती व्यावसायिक हेतूसाठी टंकलेखन यंत्र/कार वापरत असल्याचे म्हटले जाऊ शकते. तथापि, स्पष्टीकरण स्पष्ट करते की काही विशिष्ट परिस्थितींमध्ये, 'व्यापारी प्रयोजनासाठी' वस्तूंची खरेदी केल्याने खरेदीदार अद्याप 'उपभोक्ता' या संज्ञेतून बाहेर पडणार नाही. जर खरेदीदार स्वतःच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आपला उदरनिर्वाह कमावण्याच्या उद्देशाने व्यावसायिक वापर करत असेल, तर अशा वस्तूंचा खरेदीदार अजूनही 'उपभोक्ता' आहे. वर दिलेल्या दृष्टांतात, जर खरेदीदार स्वतः टंकलेखन यंत्रावर काम करत असेल किंवा स्वतः टॅक्सी म्हणून गाडी चालवत असेल, तर तो ग्राहक होण्यापासून वंचित राहत नाही. दुसऱ्या शब्दांत, जर वस्तूंचा खरेदीदार स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी, म्हणजेच

स्वयंरोजगाराच्या माध्यमातून त्यांचा वापर करत असेल, तर ते 'व्यापारी प्रयोजन' म्हणून मानले जाणार नाही आणि तो कायद्याच्या उद्देशांसाठी ग्राहक होण्यापासून वंचित राहणार नाही. या स्पष्टीकरणामुळे 'व्यापारी प्रयोजन' म्हणजे काय हा प्रश्न वस्तुस्थितीचा प्रश्न बनतो जो कि प्रत्येक प्रकरणाच्या तथ्यांनुसार ठरविण्यात आला पाहिजे. वस्तूंचे मूल्य महत्त्वाचे नसते, तर खरेदी केलेल्या वस्तू कोणत्या उद्देशा करीता आहेत हे, महत्त्वाचे असते. स्पष्टीकरणात वापरलेले अनेक शब्द, म्हणजेच, "ते स्वतःच वापरतात", "केवळ आपल्या उपजीविकेच्या उद्देशाने" आणि "स्वयंरोजगाराच्या माध्यमातून", मधून संसदेचा हेतू अगदी स्पष्ट होतो की खरेदी केलेल्या वस्तूंचा वापर खरेदीदाराने स्वतः केला पाहिजे, त्याच्या उपजीविकेसाठी स्वतःला कार्यरत केले पाहिजे. आणखी काही उदाहरणे आपण काय म्हणतो यावर भर देतील. जी व्यक्ती स्वतःच्या उपजीविकेसाठी भाड्याने चालविण्यासाठी रिक्षा खरेदी करतो, तो ग्राहक ठरेल. त्याचप्रमाणे, ट्रकचा खरेदीदार जो तो स्वतः सार्वजनिक वाहक म्हणून चालवण्यासाठी खरेदी करतो तो ग्राहक असेल. जी व्यक्ती स्वतःच्या उपजीविकेसाठी लेथ मशीन किंवा इतर मशीन स्वतः चालवण्यासाठी खरेदी करते ती व्यक्ती ग्राहक ठरेल. (वरील उदाहरणांमध्ये, जर असा खरेदीदार वाहन किंवा यंत्रसामग्री संचलनासाठी त्याला मदत/मदत करण्यासाठी एक किंवा दोन व्यक्तींची मदत घेत असेल, तर तो ग्राहक होण्यापासून वंचित राहत नाही.) याउलट, जी व्यक्ती ऑटो-रिक्षा, कार किंवा लेथ मशिन किंवा दुसरे यंत्र जे केवळ दुसऱ्या व्यक्तीद्वारे चालवले किंवा संचालित करण्यासाठी खरेदी करतो, तर ती व्यक्ती ग्राहक होणार नाही. स्पष्टीकरणात 'त्याने वापरलेल्या' आणि 'स्वयंरोजगाराच्या माध्यमातून' या शब्दप्रयोगांमध्ये बसणारी ही महत्त्वाची मर्यादा आहे. "त्याचा उदरनिर्वाह कमावण्याच्या उद्देशाने" या शब्दांच्या अर्थातील संदिग्धता इतर दोन शब्दांच्या संचाद्वारे स्पष्ट केली जाते.

आणि १९९३ च्या सुधारणांनंतरच्या 'उपभोक्ता' या व्याख्येच्या न्याय्य विश्लेषणानंतर शेवटी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलाः

"२१. म्हणून, आपण असे मानायला हवे कीः

(i) ग्राहक संरक्षण (दुरुस्ती) अधिनियम (१९९३ चा ५०) (१९९३ चे २४ वे अध्यादेश च्या जागी) दि. १८/०६/१९९३ पासून लागू होणारे स्पष्टीकरण स्पष्टीकरणात्मक स्वरूपाचे आहे

आणि सर्व प्रलंबित कार्यवाहीला लागू होते.

(ii) एखाद्या व्यक्तीने ज्या उद्देशाने वस्तू खरेदी केल्या आहेत, तो कायद्याच्या कलम २ (डी) मधील 'उपभोक्ता' या शब्दाच्या व्याख्येच्या अर्थांतर्गत 'व्यापारी प्रयोजन' आहे की नाही, हा नेहमीच प्रत्येक प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थितीनुसार निश्चित केला जाणारा वस्तुस्थितीचा प्रश्न असतो.

(iii) जी व्यक्ती वस्तू खरेदी करते आणि त्यांचा वापर केवळ स्वतःच्या उपजीविकेच्या उद्देशाने स्वयंरोजगाराच्या माध्यमातून करते, ती व्यक्ती 'उपभोक्ता' या संज्ञेमध्ये समाविष्ट आहे.

३२. लीलावती किर्तिलाल मेहता मेडिकल ट्रस्ट -विरुद्ध- युनिक शांती डेव्हलपर्स[4] या खटल्यात या न्यायालयाने या विषयावरील कायद्याच्या स्पष्टीकरणावर अधिक विचार केला, ज्यामध्ये आमच्यापैकी एक (रस्तोगी, न्या.) सदस्य होते आणि लीलावती किर्तिलाल मेहता मेडिकल ट्रस्ट रुग्णालयात काम करणाऱ्या परिचारिकांना निवास प्रदान करण्याच्या उद्देशाने सदनिका खरेदी करणे व्यावसायिक हेतूसाठी सेवांची खरेदी करण्यास पात्र आहे का आणि १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २(१)(डी) अंतर्गत हॉस्पिटल ट्रस्टला 'उपभोक्ता' च्या व्याख्येपासून वगळण्यात आले आहे का, हे प्रश्न विचारात घेण्यासाठी उपस्थित झाले, ह्या न्यायालयाने १९८६ च्या अधिनियमाच्या योजनेचा फेरविचार केल्यानंतर आणि लक्ष्मी इंजिनीरिंग वर्क्स (वर नमूद केलेल्या) मधील प्राधान्याच्या कायद्याची दखल घेऊन, ज्याचा संदर्भ देण्यात आला आहे आणि पॅरामाऊंट डिजीटल कलर लॅब -विरुद्ध - ए जि एफ ए इंडिया प्रायव्हेट लिमिटेड [5] या प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेत असे ठरविण्यात आले कि, एखादी व्यक्ती ग्राहक आहे किंवा नाही अथवा इतर कृती व्यापारी प्रयोजनासाठी करण्यात आल्या आहेत किंवा नाही हे नेहमी प्रत्येक प्रकरणाच्या तथ्य आणि परिस्थितीवर अवलंबून राहणार.

३३. व्यावसायिक उपक्रमांमध्ये गुंतलेल्या व्यक्तीने त्याच्या वैयक्तिक वापरासाठी किंवा उपभोगण्यासाठी किंवा लाभार्थीच्या वैयक्तिक वापरासाठी वस्तू खरेदी केल्या आहेत किंवा

सेवेचा लाभ घेतला आहे आणि अशी खरेदी त्यांच्या सामान्य नफा कमावणाऱ्या उपक्रमांशी किंवा स्वयंरोजगाराच्या निर्मितीशी जोडली गेली नाही, अशी स्थिती असू शकते, अशी व्यक्ती तरीही ग्राहक असल्याचा दावा करू शकते आणि विविध दृष्टांतांवर चर्चा केल्यानंतर, हा उपक्रम किंवा व्यवहार व्यापारी प्रयोजनासाठी आहे की नाही हे ठरवण्यासाठी काढलेल्या व्यापक तत्त्वांची नोंद घेतल्यानंतर चर्चेचा सारांश खालीलप्रमाणे दिला जाऊ शकतोः

"१९. वरील चर्चेतून थोडक्यात सांगायचे तर, जरी प्रत्येक बाबतीत अवरोधिक सूत्र स्वीकारले जाऊ शकत नसले तरी, एखादा उपक्रम किंवा व्यवहार "व्यापारी प्रयोजना साठी" आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी खालील व्यापक तत्त्वे काढली जाऊ शकतातः

१९.१. एखादा व्यवहार व्यावसायिक हेतूसाठी आहे की नाही हा प्रश्न प्रत्येक खटल्याच्या तथ्यांवर आणि परिस्थितीवर अवलंबून असेल. तथापि, सामान्यतः, "व्यापारी प्रयोजन" मध्ये उत्पादन/औद्योगिक कृती किंवा व्यावसायिक घटकांमधील व्यवसाय-ते-व्यवसाय व्यवहार समाविष्ट असल्याचे समजले जाते.

१९.२. वस्तू किंवा सेवेच्या खरेदीचा नफा कमावणाऱ्या कृतींसोबत जवळचा आणि थेट संबंध असावा.

१९.३. खरेदी करणाऱ्या व्यक्तीची ओळख किंवा व्यवहाराचे मूल्य हे ते व्यावसायिक हेतूसाठी आहे की नाही या प्रश्नावर निर्णायक नाही. खरेदीदार आणि/किंवा त्यांच्या लाभार्थीसाठी काही प्रकारचा नफा निर्माण करणे हा व्यवहाराचा प्रमुख हेतू किंवा प्रमुख उद्देश होता का हे पाहावे लागेल.

१९.४. जर असे आढळून आले की वस्तू किंवा सेवा खरेदी करण्यामागील प्रमुख हेतू खरेदीदाराच्या आणि/किंवा त्यांच्या लाभार्थीच्या वैयक्तिक वापरासाठी आणि वापरासाठी होता, किंवा अन्यथा कोणत्याही व्यावसायिक कृतींशी संबंधित नसेल, तर अशी खरेदी 'स्वयंरोजगाराच्या माध्यमातून उपजीविका निर्माण करण्याच्या' उद्देशाने होती का या प्रश्नावर विचार करण्याची गरज नाही."

३४. या न्यायालयाच्या लक्षात आले की, लीलावती रुग्णालयात नियुक्त केलेल्या परिचारिकांना वसतिगृहाच्या सुविधा पुरविल्या गेल्या होत्या, परंतु प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर काही काळानंतर इमारतीच्या कथित निकृष्ट गुणवत्तेमुळे हे बांधकाम मोडकळीस आले आणि परिचारिका कर्मचाऱ्यांना त्यांनी वापरलेले सदनिका रिकाम्या कराव्या लागल्या आणि लीलावती रुग्णालयाने भाडयाच्या वार्षिक नुकसानीच्या भरपाईसाठी दाखल केलेली ग्राहक तक्रार कायम ठेवण्यायोग्य होती किंवा नाही आणि अधिनियमाच्या कलम २(१)(डी) अंतर्गत विश्वस्त संस्था ही एक उपभोक्ता होती की नाही.

३५. लीलावती कीर्तिलाल मेहता मेडिकल विश्वस्त संस्था(उपरोल्लेखित) प्रकरणात, या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, अपीलकर्ता विश्वस्त संस्थेने सदनिकांची खरेदी करणे आणि त्याचा नफा मिळवून देणारा क्रियाकलाप यामध्ये कोणताही संबंध नाही, कारण सदनिकांचा ताबा रुग्णालयातील कोणत्याही वैद्यकीय/निदान सुविधा घेण्यासाठी नव्हे तर रुग्णालयाने नियुक्त केलेल्या परिचारिकांना सामावून घेण्यासाठी होता. दिलेल्या परिस्थितीत, परिचारिकांना सुविधा पुरवून नफा मिळवण्याशी संस्थेचा काहीही संबंध नाही आणि विचाराधीन व्यवहारासाठी अधिनियम, १९८६ च्या कलम २(१)(डी) अंतर्गत विश्वस्त संस्था एक "उपभोक्ता" आहे असे मानले आहे.

३६. अशा प्रकारे, काय महत्त्वाचे आहे ते म्हणजे अधिनियम, १९८६ च्या कलम २(१)(डी) अंतर्गत समाविष्ट असलेल्या 'उपभोक्ता' असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीने अधिनियम, १९८६ अंतर्गत ज्या संदर्भात दावा दाखल केला आहे, त्या संदर्भात कायद्याच्या अशा प्रदर्शनाचा पुनरुच्चार या न्यायालयाने अलीकडेच श्रीकांत जी. मंत्री - विरुद्ध- पंजाब नॅशनल बँक[६] मध्ये केला आहे आणि या विषयावरील विश्लेषणानंतर आणि लीलावती कीर्तिलाल मेहता मेडिकल विश्वस्त संस्था(उपरोल्लेखित) मधील या न्यायालयाच्या निकालाची दखल घेतल्यानंतर, ज्याचा संदर्भ देण्यात आला आहे, त्या प्रकरणाची वादातीत तथ्यांच्या आधारावर चौकशी केली आणि निष्कर्ष नोंदवला की, वादातीत व्यवहार हा

अधिकारक्षेत्रांतर्गत दावा करण्याच्या उद्देशाने 'ग्राहक' किंवा 'सेवा' या संज्ञेच्या व्याख्येत येईल.

३७. अशा प्रकारे, काय उत्तम निवडून घेतले, ते म्हणजे "उपभोक्ता" या संज्ञेतून व्यावसायिक उद्योग किंवा १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २(१)(एम) मध्ये परिभाषित केलेल्या "व्यक्ती" या अभिव्यक्तीखाली समाविष्ट असलेल्या व्यक्तीला, केवळ तो एक व्यावसायिक उपक्रम आहे म्हणून वगळण्यात आलेले नाही. याउलट, नोंदणीकृत असो वा नसो, एखादी संस्था ही अशी व्यक्ती असते जी नेहमीच १९८६ च्या अधिनियमाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करू शकते, परंतु ती १९८६ च्या अधिनियमाच्या कलम २(१)(डी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे 'उपभोक्ता' या शब्दाच्या व्याप्ती आणि कक्षेमध्ये येते.

३८. प्रस्तुत प्रकरणात वरील तत्त्वे लागू करताना, विमा सेवेचा नफा कमावणाऱ्या क्रियाकलापांशी जवळचा आणि थेट संबंध आहे की नाही आणि खरेदीदार आणि/किंवा त्यांच्या लाभार्थीसाठी काही प्रकारचा नफा निर्माण करणे हा व्यवहाराचा प्रमुख हेतू किंवा प्रमुख उद्देश होता की नाही हे निर्धारित करणे आवश्यक आहे. विमाधारक हा व्यावसायिक उपक्रम आहे ही वस्तुस्थिती अधिनियमाच्या कलम २(१)(डी) च्या कक्षेत विमा पॉलिसी ही व्यावसायिक हेतू म्हणून गणली जाईल की नाही हे ठरवण्याशी संबंधित नाही.

३९. कर्नाटक पॉवर ट्रान्समिशन कॉर्पोरेशन - विरुद्ध - अशोक आयर्न वर्क्स प्रायव्हेट लिमिटेड[७] या प्रकरणात, या न्यायालयाने प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देताना असे निरीक्षण नोंदवले :

> "**१७.** एखाद्या शब्दाचा किंवा अभिव्यक्तीचा अर्थ लावणे हे मजकूर आणि संदर्भावर अवलंबून असले पाहिजे, यात काही शंका नाही. विधिमंडळाने 'समाविष्ट' या शब्दाचा अवलंब केल्याने बहुधा अशा अभिव्यक्तीला व्यापक आणि विस्तृत अर्थ द्यायचा विधिमंडळाचा हेतू दिसून येतो. तथापि, काहीवेळा, संदर्भ असे सुचवू शकतो की 'समाविष्ट' हा शब्द 'अर्थ' म्हणून तयार केला गेला असावा. अधिनियमाची

मांडणी, संदर्भ आणि उद्देश अशा अधिनियमाच्या उद्देशांसाठी 'समाविष्ट' शब्दाच्या स्पष्टीकरणासाठी पुरेसे मार्गदर्शन प्रदान करू शकतात.

१८. कलम २(१)(एम) ज्यामध्ये चार श्रेणींची गणना केली आहे, म्हणजे,

(i) एखादी संस्था, नोंदणीकृत असो वा नसो;

(ii) हिंदू अविभाजित कुटुंब;

(iii) सहकारी संस्था; आणि

(iv) 'व्यक्ती' ची व्याख्या करताना, व्यक्तींच्या इतर प्रत्येक संघटना ज्या संस्था नोंदणी कायदा, १८६० (१८६० चा २१) अंतर्गत नोंदणीकृत असोत किंवा नसोत, निर्बंधात्मक आणि या चार श्रेणींपुरते मर्यादित धरले जाऊ शकत नाही, कारण 'व्यक्ती' म्हणजे गणना केलेल्या गोष्टींपैकी एक किंवा इतर गोष्टींचा अर्थ असेल, परंतु त्यात त्यांचा समावेश असेल.

१९. सर्वसाधारण परिभाषा अधिनियम , १८९७ च्या कलम ३(४२) मध्ये 'व्यक्ती' या शब्दाची व्याख्या केली आहेः

"३(४२) 'व्यक्ती' मध्ये कोणतीही कंपनी किंवा संघटना किंवा व्यक्तींची संस्था समाविष्ट असेल, मग ती विधिसंस्थापित असो वा नसो; "

२०. १९८६ च्या अधिनियमाचे कलम ३, ज्यावर केपीटीसी (KPTC) चे विद्वान वकिलांनी भर दिला आहे, त्यात अशी तरतूद आहे की, या अधिनियमाच्या तरतुदी सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमाच्या व्यतिरिक्त आहेत आणि त्या अवमानकारक नाहीत. केपीटीसी (KPTC) च्या युक्तिवादाला मदत करण्याऐवजी ही तरतूद सुचवेल की, १९८६ च्या अधिनियमांतर्गत (खाली दिलेल्या) प्रदान केलेल्या उपायाची उपलब्धता ही सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींमध्ये भर घालणे आहे. हे कोणत्याही प्रकारे 'व्यक्ती' च्या व्याख्येला प्रतिबंधित करण्यासाठी कोणतेही संकेत देत नाही.

२१. कलम २(१)(एम) हे सर्व प्रश्नांच्या पलीकडे एक अर्थ लावणारे खंड आहे आणि कलम २(१)(डी) मधील 'व्यक्ती' या अभिव्यक्तीचा अर्थ लावताना विधिमंडळाने विचारात घेतले पाहिजे. कलम २(१)(एम) मध्ये 'व्यक्ती' या शब्दाची ची व्याख्या करताना, कंपनीसारख्या कायदेशीर व्यक्तीला वगळण्याचा

विधिमंडळाचा कधीही हेतू नव्हता. वस्तुतः, त्यात नमूद केलेल्या गणनेनुसार चार श्रेणी सूचित करतात, श्रेणी (i), (ii) आणि (iv) असंघटित असल्याने आणि श्रेणी (iii) कॉर्पोरेट असल्याने, त्यात निगम निकाय तसेच अविधीतसंस्थापित निकाय समावेश करण्याचा हेतू आहे. कलम २(१)(एम) मधील 'व्यक्ती' या शब्दाची व्याख्या सर्वसमावेशक आहे आणि संपूर्ण नाही. कंपनी ही कलम २(१)(डी) सह कलम २(१)(एम) च्या अर्थानुसार एक व्यक्ती आहे आणि आम्ही त्यानुसार आहोत अशी कोणतीही शंका आम्हाला मान्य आहे असे दिसत नाही."

४०. उपरोक्त चाचणी लागू करताना, दोन गोष्टी निवडल्या जातात, त्या म्हणजे, (i) वस्तू पुनर्विक्रीसाठी किंवा व्यावसायिक हेतूसाठी खरेदी केल्या जातात की नाही; किंवा (ii) सेवा कोणत्याही व्यावसायिक हेतूसाठी वापरल्या जातात की नाही. दुहेरी वर्गीकरण म्हणजे व्यावसायिक उद्देश आणि गैर-व्यावसायिक उद्देश. जर माल पुनर्विक्रीसाठी किंवा व्यावसायिक हेतूसाठी खरेदी केल्या गेल्या असतील, तर अशा ग्राहकाला १९८६ च्या अधिनियमाच्या व्याप्तीतून वगळले जाईल. उदाहरणार्थ, जर एखादा उत्पादक जो उत्पादन अ चे उत्पादन करत असेल, आणि अशा उत्पादनासाठी त्याला कच्चा माल असलेल्या वस्तू खरेदी करणे आवश्यक असेल तर अशा वस्तूंची खरेदी व्यावसायिक हेतूसाठी असेल. याउलट, जर त्याच उत्पादकाने त्याच्या निवासस्थानी किंवा अगदी त्याच्या कार्यालयासाठी त्याच्या वापरासाठी रेफ्रिजरेटर, टेलिव्हिजन किंवा वातानुकूलन यंत्र खरेदी केले तर त्याचा नफा कमावण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसेल, तर ते व्यावसायिक हेतूसाठी असल्याचे मानले जाऊ शकत नाही आणि वर नमूद केलेल्या कारणास्तव तो अधिनियम, १९८६ अंतर्गत ग्राहक मंचाकडे जाण्यास पात्र आहे.

४१. त्याचप्रमाणे, वैद्यकीय व्यावसायिकांची सेवा घेणारे रुग्णालय हा एक व्यावसायिक उद्देश असेल, परंतु जर एखाद्या व्यक्तीने त्याच्या आजारासाठी अशा सेवांचा लाभ घेतला तर तो एक बिगर-व्यावसायिक उद्देश मानला जाईल. "कोणत्याही व्यावसायिक हेतूसाठी" या शब्दांचा व्यापक अर्थ घेतल्यास, याचा अर्थ असा होईल की खरेदी केलेल्या वस्तू किंवा

भाड्याने घेतलेल्या सेवा थेट नफा कमावण्याच्या उद्देशाने कोणत्याही उपक्रमात वापरल्या पाहिजेत." नफा हा व्यावसायिक उद्देशाचा मुख्य उद्देश आहे, परंतु ज्या बाबतीत खरेदी केलेल्या वस्तू किंवा सेवा भाड्याने घेणे ही एक क्रियाकलाप आहे, ज्याचा हेतू थेट नफा मिळविण्याचा नाही, अशा परिस्थितीत तो व्यावसायिक हेतू असणार नाही.

४२. दुसऱ्या शब्दांत, हे आणखी स्पष्ट करण्यासाठी, हा व्यवहार व्यावसायिक हेतूसाठी आहे की नाही किंवा तक्रारदाराला अधिनियम, १९८६ च्या व्याप्तीमध्ये आणि कक्षेत "उपभोक्ता" म्हणून धरले जाऊ शकते की नाही याबद्दल काही उदाहरणे देऊया.

(i). एका धर्मादाय विश्वस्त संस्थेने एक सीटी स्कॅन यंत्र (a CT Scan Machine) खरेदी केले होते आणि ते सदोष असल्याचे आढळून आले होते, त्यामुळे ते यंत्र (मशीन) व्यावसायिक हेतूसाठी खरेदी केले गेले होते का आणि अपीलकर्ता ग्राहक होता का असा प्रश्न उपस्थित झाला. तथ्यांच्या कथनानुसार, हे न्यायालय कल्पवृक्ष चॅरिटेबल ट्रस्ट - विरुद्ध - तोशनीवाल ब्रदर्स (बॉम्बे) प्रायव्हेट लिमिटेड[८] या प्रकरणात असे ग्राह्य धरतात की, हे यंत्र (मशीन) धर्मादाय विश्वस्त संस्थेने व्यावसायिक हेतूसाठी खरेदी केले होते कारण सीटी स्कॅन (CT Scan) करून घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्यासाठी पैसे द्यावे लागतात आणि प्रदान केलेल्या सेवा विनामूल्य नसतात आणि त्यामुळे विश्वस्त संस्था ग्राहक नव्हती.

(ii). राजीव मेटल वर्क्स - विरुद्ध - मिनरल्स अँड मेटल ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड[९] मध्ये, एका उत्पादकाने वैधानिक प्राधिकरणाच्या माध्यमातून कच्चा माल आयात केला ज्याने तयार उत्पादनाच्या निर्मिती आणि विक्रीसाठी वळण संस्था (Canalizing Agency) म्हणून काम केले. उत्तरवादीने अपीलकर्त्याने मागणी केलेल्या वस्तूचा आवश्यक प्रमाणात पुरवठा केला नसल्याचा आरोप करत अपीलकर्त्याने राष्ट्रीय आयोगाकडे धाव घेतली. ही खरेदी व्यावसायिक हेतूसाठी होती आणि १९८६ च्या अधिनियमाच्या उद्देशाने उत्पादक "उपभोक्ता" नव्हता, असे या न्यायालयाने म्हटले.

(iii). ज्या बँकेने विमा कंपनीकडून बँकर्सची नुकसान भरपाई विमा पॉलिसी घेतली होती आणि तिच्या एका शाखेतील काही व्यवहारांमुळे तोटा सहन करावा लागला होता, त्या बँकेने विमा दावा केला की, तो शाखा व्यवस्थापकाच्या अप्रामाणिकपणामुळे झाला आहे आणि विमा कंपनीने दावा फेटाळला होता की, कथित तोटा शाखा व्यवस्थापकाच्या काही अप्रामाणिकपणामुळे झाला होता आणि तो व्यावसायिक हेतूने ग्राहक असू शकत नाही.

(iv). तक्रारदार ही निदान चिकित्सालय चालवणारी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आहे आणि तक्रारदार विरोधी पक्षाकडून खरेदी केलेले क्ष-किरण यंत्र (X-ray Machine) सदोष असल्याचा आरोप करते. जर आक्षेप घेतला गेला की, यंत्र व्यावसायिक हेतूसाठी खरेदी केले गेले होते आणि तक्रारदाराला १९८६ च्या अधिनियमानुसार परिभाषित केल्यानुसार ग्राहक म्हटले जाऊ शकत नाही कारण तो व्यावसायिक हेतूसाठी नियुक्त केला गेला आहे आणि नफ्यासाठी व्यवसाय करत आहे, म्हणून तक्रारदार प्रत्यक्षात १९८६ च्या अधिनियमानुसार उपभोक्ता नाही.

(v). एखाद्या कंपनीने व्यावसायिक हेतूसाठी कंपनीच्या व्यवसायाच्या चांगल्या व्यवस्थापनासाठी ईपीबीएक्स (EPBX) प्रणाली खरेदी केली आणि तक्रार जी सदोष प्रणालीच्या कथित पुरवठ्यासाठी दाखल केली ती तक्रार अधिनियम, १९८६ च्या कलम २(१)(डी) च्या स्पष्टीकरणात्मक कलमांतर्गत समाविष्ट केली जाऊ शकत नाही कारण नफा कमावण्यासाठी व्यवहाराचा कोणताही संबंध नाही.

४३. अशा प्रकारे, शेवटी जे निष्पन्न केले जाते ते असे आहे की, प्रत्येक प्रकरणाची तपासणी त्याच्या स्वतःच्या तथ्यांवर आणि परिस्थितीवर करावी लागते आणि कोणतीही कृती किंवा व्यवहार नफा कमावण्याच्या व्यावसायिक हेतूसाठी आहे की नाही हे तपासायचे आहे आणि हे एक सरळ सूत्र असू शकत नाही जे स्वीकारले जाऊ शकते आणि या न्यायालयाने

घालून दिलेल्या व्यापक तत्त्वांवर प्रत्येक प्रकरणाची तपासणी करणे आवश्यक आहे, ज्याची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

४४. प्रस्तुत प्रकरणात वरील तत्त्वे लागू करताना, काय निश्चित करायचे आहे तर ते म्हणजे विमा सेवेचा नफा कमावणाऱ्या क्रियाकलापांशी जवळचा आणि थेट संबंध होता की नाही हे निर्धारित करणे आवश्यक आहे आणि व्यवहाराचा प्रमुख हेतू किंवा प्रमुख उद्देश विमाधारक किंवा लाभार्थीसाठी काही प्रकारची नफा निर्मिती सुलभ करणे हा होता की नाही आणि आमचे उत्तर नकारात्मक आहे आणि त्यानुसार आमचे असे मत आहे की, येथे विमा उतरवलेल्या उत्तरवादीने दाखल केलेल्या तक्रारीचा नफा कमावणाऱ्या क्रियाकलापांशी जवळचा किंवा थेट संबंध नाही आणि विम्याचा दावा म्हणजे उत्तरवादी विमाधारकाला झालेल्या नुकसानाची भरपाई करणे आहे आणि आयोगाने योग्यरित्या असे म्हटले आहे की उत्तरवादी हा अधिनियम, १९८६ च्या कलम २(१)(डी) अंतर्गत "उपभोक्ता" आहे.

४५. आम्ही पुढे पुन्हा सांगतो की, सामान्यतः विमा कराराचे स्वरूप नेहमीच नुकसानीची भरपाई करून देणे असते. विमा करार हे नुकसानभरपाईचे करार आहेत ज्यात एखादी व्यक्ती अज्ञात किंवा आकस्मिक घटनेमुळे उद्भवणारे नुकसान/हानी किंवा दायित्व यांपासून दुसऱ्याला नुकसानभरपाई देण्याचे काम करते आणि ती केवळ काही आकस्मिक परिस्थितीला किंवा भविष्यात घडू शकणाऱ्या कृतीला लागू होते.

४६. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - विरुद्ध - लेव्हिस स्ट्रॉस (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड[१०] मध्ये या न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे :

> "५३. <u>विम्याचा करार हा निश्चित केलेल्या नुकसानीच्या नुकसानभरपाईसाठी असतो आणि नेहमीच असेल, तो त्यापेक्षा जास्त पण राहणार नाही आणि कमी पण राहणार नाही</u>. विशिष्ट जोखमींच्या बाबतीत, जसे की आगीमुळे झालेल्या नुकसानीमुळे उद्भवणारी जोखीम इत्यादींच्या बाबतीत, विमाधारक नफा मिळवू शकत नाही आणि दुहेरी विम्याचा लाभ पण घेऊ

शकत नाही. फार पूर्वी, ब्रेट, एलजे (LJ) यांनी कॅस्टेलेन - विरुद्ध - प्रेस्टन [कॅस्टेलेन - विरुद्ध - प्रेस्टन, [एल. आर.] ११ क्यू. बी. डी. (Q.B.D.) ३८०] मध्ये असे म्हटले होते की : (क्यू. बी. डी. (Q.B.D.) पान ३८६)

"………विम्याचा करार हा ………… नुकसानभरपाईचा करार आहे…….आणि या कराराचा अर्थ असा आहे की नुकसान झाल्यास विमाधारकाला …..पूर्णपणे नुकसानभरपाई दिली जाईल ……. परंतु पूर्णपणे नुकसानभरपाईपेक्षा जास्त कधीही दिली जाणार नाही"."

(भर दिला गेला)

४७. अशा प्रकारे, असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की, प्रस्तुत प्रकरणात विमा पॉलिसी काढणे हा स्पष्टपणे तोटा / नुकसान होण्याच्या जोखमीची भरपाई करण्यासाठीचा एक कायदा आहे आणि त्यात नफा निर्माण करण्याचा कोणताही घटक नाही आणि तरीही या न्यायालयाने जे काही व्यक्त केले आहे ते उदाहरणात्मक आहे; प्रत्येक प्रकरणातील तथ्यांची तपासण्यासाठी ते नेहमीच खुले राहील, कारण ज्या व्यवहाराच्या संदर्भात दावा केला गेला आहे त्या व्यवहाराचा नफा निर्माण करणाऱ्या क्रियाकलापांशी जवळचा आणि थेट संबंध आहे.

४८. आम्ही अपीलकर्त्याच्या वतीने केलेल्या निवेदनाशी सहमत नाही की, जर विम्याचे दावे हे अधिनियम, १९८६ अंतर्गत समाविष्ट केले गेले असतील, तर वस्तुतः सर्व विमा प्रकरणे हे अधिनियम, १९८६ च्या कक्षेत येतील आणि यामुळे २०१५ चा अधिनियम निरर्थक ठरेल. आमच्या मते, या दोन्ही अधिनियमांची व्याप्ती आणि कक्षा वेगवेगळी आहेत आणि त्यांची उपचारात्मक यंत्रणा वेगळी आहे, ते वेगवेगळ्या क्षेत्रात आहेत ज्यांचा कोणताही अंतर्गत संबंध नाही.

४९. परिणामी, याचिकेत काही तथ्य नाही आणि त्यानुसार याचिका फेटाळल्या जातात खर्चाबाबत आदेश नाही.

५०. राज्य आयोगाने उत्तरवादींच्या तक्रारीवर अधिनियमानुसार, गुणवत्तेनुसार अभिनिर्णय द्यावा आणि ही एक जुनी बाब असल्याने, शक्य तितक्या लवकर, परंतु कोणत्याही परिस्थितीत हा अभिनिर्णय एका वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर नसावा.

५१. प्रलंबित असलेला अर्ज (असलेले अर्ज) निकाली काढले जातात.

<u>दिवाणी अपील अर्ज क्रमांक २००७ चा ५३५४ - (युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - विरुद्ध - मेसर्स दिवाकर गोईराम पोर्खायत)</u>

५२. प्रस्तूत अपील राष्ट्रीय आयोगाने दिनांक ३ डिसेंबर २००४ रोजी दिलेल्या आदेशाविरूद्ध निर्देशित केली आहे, ज्यात असे म्हटले आहे की, उत्तरवादीने (व्यावसायिक युनिट) या प्रकरणाच्या तथ्यांमध्ये घेतलेली विमा पॉलिसी केवळ उत्तरवादी / तक्रारदाराला झालेल्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी होती आणि ज्या व्यवहाराच्या संदर्भात विमा दावा अपीलकर्त्याने नाकारला आहे, त्याचा नफा निर्माण करणाऱ्या क्रियाकलापांशी थेट संबंध नव्हता आणि अधिनियम, १९८६ च्या कलम २ (१) (डी) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे तो "उपभोक्ता" होता.

५३. उत्तरवादी / तक्रारदार (विमाधारक) 'खजाना ज्वेलर्स' या नावाने आणि शैलीत दागिन्यांची विक्री आणि खरेदीचा व्यवसाय करत आहे, ज्याने व्यवसायातील दागिन्यांची जोखीम भरून काढण्यासाठी २१ ऑक्टोबर १९९९ ते २० ऑक्टोबर २००० या कालावधीसाठी अपीलकर्त्याकडून विमा पॉलिसी घेतली होती.

५४. २४ जून २००० रोजी सकाळी सुमारे ७ वाजता जेव्हा उत्तरवादीच्या एका कर्मचाऱ्याने असे पाहिले की शोरूमचे शटर अंशतः उघडे होते आणि ते चोरी झाल्याचे दर्शवित होते

आणि तपासणी केल्यावर असे आढळून आले की रू. २०,५५,२००/- चा माल शोरुममधून चोरीला गेला.

५५. नुकसान भरपाईसाठी उत्तरवादीने केलेला दावा अपीलकर्त्याने फेटाळला आणि त्याला उत्तरवादीने अहमदाबाद येथील राज्य आयोगासमोर ग्राहक तक्रार दाखल करून आव्हान दिले, जी तक्रार १ एप्रिल २००४ रोजीच्या आदेशाद्वारे अधिनियम, १९८६ च्या कलम २(१)(डी) च्या व्याप्तीमध्ये उत्तरवादी "उपभोक्ता" नव्हता या आधारावर फेटाळण्यात आली.

५६. उत्तरवादीने व्यवहाराच्या स्वरूपाची दखल घेत राष्ट्रीय आयोगासमोर अपील दाखल करून खारिज करण्याच्या आदेशाला आव्हान दिले आणि ३ डिसेंबर २००४ रोजीच्या हर्सोलिया मोटर्सच्या प्रकरणात आयोगाच्या आदेशावर भर देत आयोगाने असे म्हटले की, ज्या व्यवहाराच्या संदर्भात उत्तरवादीने विमा दावा केला आहे, त्याचा नफा कमावण्याच्या क्रियाकलापांशी थेट संबंध नाही आणि विमा क्षतितारण केवळ चोरीमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी प्राप्त केले गेले होते आणि राष्ट्रीय आयोगाने ३ डिसेंबर २००४ रोजी पारित केलेला आदेश आमच्यासमोर अपीलमध्ये आव्हानात्मक विषय आहे.

५७. २००७ च्या दिवाणी अपील क्रमांक ५३५२-५२५३ (नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - विरुद्ध - हर्सोलिया मोटर्स) मध्ये आज आम्ही दिलेल्या निर्णयाच्या प्रकाशात असे आढळून येते की, प्रस्तूतचे अपील तथ्यहीन आहे आणि त्यानुसार ते फेटाळले जाते. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

५८. तक्रार राज्य आयोगाच्या फाईलवर पुनर्स्थापित केल्या जाते आणि कायद्यानुसार तिच्या गुणवत्तेनुसार न्यायनिवाडा करण्यात यावा आणि शक्य तितक्या लवकर निर्णय

घेण्यात यावा, परंतु कोणत्याही परिस्थितीत हा निर्णय एका वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर घेण्यात येऊ नये.

५९. प्रलंबित असलेला अर्ज (असलेले अर्ज) निकाली काढले जातात.

<u>दिवाणी अर्ज क्रमांक २०१२ चा २८२१</u> - नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - विरुद्ध - मेसर्स अंकुर आणि इतर.

६०. अपीलांतर्गत दिलेला न्यायनिर्णय राष्ट्रीय आयोगाने दिनांक १५ डिसेंबर २०१० रोजी पारित केला आहे.

६१. या प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी आहे की, उत्तरवादी हा घाऊक कपड्यांच्या व्यवसायात गुंतलेला आहे, ज्याने ६ जानेवारी २००६ ते ५ जानेवारी २००७ या कालावधीसाठी एकूण रु. ६०,००,०००/- मध्ये मानक आग आणि संकट धोरण प्रभावीपणे घेतले. २८ डिसेंबर २००६ रोजी लागलेल्या आगीत उत्तरवादीच्या कारखान्याचे नुकसान झाले. अपीलकर्त्याने अंतिम सर्वेक्षणासाठी मेसर्स एपेक्स सर्वेअर्स प्रायव्हेट लिमिटेड या स्पॉट सर्वेक्षकाला नियुक्त केले, ज्याने २२ डिसेंबर २००८ रोजी आपला अहवाल सादर केला की, रुपये १ लाख बचत रक्कम वजा केल्यावर रु. ५३,१७,७९०/- च्या नुकसानीचे मूल्यांकन आणि रुपये ५१,९६९/ च्या आगीनंतर फॅक्टरिंग साउंड स्टॉक जतन केला जात आहे. अपीलकर्त्याने असा दावा केला की, उत्तरवादी हा काही निर्धारक कागदपत्रे सादर करण्यात अयशस्वी ठरला आहे आणि त्यामुळे अशा आधारावरील मूल्यांकन रद्द मानले जाऊ शकते. दरम्यान, कॅनरा बँकेने (सुरक्षित कर्जदार) उत्तरवादीविरुद्ध एसएआरएफएईएसआय (SARFAESI) ची कार्यवाही सुरू केली.

६२. उत्तरवादीच्या दाव्याची प्रक्रिया सुरू असताना, उत्तरवादीने राज्य आयोगासमोर रुपये ६०,००,०००/- व्याजासह रकमेकरिता तक्रार दाखल केली. या टप्प्यावर, अपीलकर्त्याने

प्राथमिक आक्षेप दाखल केला की, उत्तरवादी हा अधिनियम, १९८६ च्या कलम २(१)(डी) च्या व्याख्येनुसार 'उपभोक्ता' नाही. राज्य आयोगाने एका टप्प्यावर असे म्हटले होते की, उत्तरवादी व्यावसायिक कार्यात गुंतलेला आहे आणि म्हणूनच तो उपभोक्ता नाही. राज्य आयोगाने परत केलेला निष्कर्ष राष्ट्रीय आयोगाने १५ डिसेंबर २०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार उलटवला होता, ज्यामध्ये असे म्हटले होते की, विमा कंपनीद्वारे त्याच्या सेवांचा लाभ घेणारी व्यावसायिक संस्था ही अधिनियम, १९८६ च्या कलम २ (१)(डी) च्या संदर्भात व्यवहाराच्या संदर्भात 'उपभोक्ता' आहे.

६३. आम्ही दिवाणी अपील क्रमांक (२००७ चा ५३५२-५३५३)(नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - विरुद्ध - हर्सोलिया मोटर्स) मध्ये तपशीलवार कारणे दिली आहेत. या अपिलांमध्ये आज आम्ही दिलेल्या निर्णयाच्या प्रकाशात असे आढळून आले की, प्रस्तूतचे अपील तथ्यहीन आहे आणि त्यानुसार ते फेटाळले जाते. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

६४. तक्रार राज्य आयोगाच्या फाईलवर पुनर्स्थापित केल्या जाते आणि कायद्यानुसार तिच्या गुणवत्तेनुसार न्यायनिवाडा करण्यात यावा आणि शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्यात यावा, परंतु कोणत्याही परिस्थितीत हा निर्णय एका वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर घेण्यात येऊ नये.

६५. आमच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, या न्यायालयाच्या दिनांक ११ मे २०११ रोजीच्या आदेशानुसार, अपीलकर्त्याने उत्तरवादीने केलेल्या दाव्यातील ५० टक्के रक्कम जमा केली होती आणि १५ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या कार्यालयीन अहवालात असे सूचित केले आहे की, रु. ५९,७४,८१४/- ह्या रक्कमेची १६ जुलै २०२३ च्या परिपक्वता तारखेसह मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करण्यात आली होती. ही रक्कम राज्य आयोगाकडे हस्तांतरित होऊ द्या आणि मुदत ठेवींमध्ये गुंतवलेला पैसा तसाच राहील आणि स्वयंचलित नूतनीकरणाच्या आधारावर व्याज देणाऱ्या खात्यात गुंतवला जाऊ शकेल आणि पक्षकार राज्य आयोगाच्या आदेशांचे पालन करतील.

६६. प्रलंबित असलेला अर्ज (असलेले अर्ज) निकाली काढले जातात.

<u>दिवाणी अर्ज क्रमांक २०१८ चा ३३५०</u> - दी बँक ऑफ न्यूयॉर्क मेलॉन (पूर्वीचे बँक ऑफ न्यूयॉर्क) - विरुद्ध - मेसर्स मेटको एक्सपोर्ट इंटरनॅशनल आणि इतर.

६७. राष्ट्रीय आयोगाने दिनांक ६ फेब्रुवारी २०१८ रोजी दिलेल्या निकालाच्या आणि आदेशाच्या विरोधात अपीलकर्त्याने विशेष अनुमती याचिका द्वारे प्रस्तूतचे अपील दाखल केले आहे.

६८. या प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी आहे की, उत्तरवादी क्रमांक १ ने तीळ आणि तेलबियांच्या पाच कंटेनरच्या पुरवठ्यासाठी युएसडी (USD) १४१,३७५ करिता त्रयस्थ असामीबरोबर (उत्तरवादी क्रमांक १ च्या इटालियन खरेदीदारासोबत) व्यवहार केला. या व्यवहाराच्या संबंधात फेडरल बँक लिमिटेडच्या (उत्तरवादी क्रमांक २ ची) चालान, मालवाहतुकीची बिले, सर्वेक्षकाचे प्रमाणपत्र, देवाणघेवाणीची बिले, फायटोसॅनेटरी प्रमाणपत्र आणि इतर संबंधित कागदपत्र (चार कागदपत्रे) इटलीतील खरेदीदाराच्या बँकरकडे पाठवण्यासाठी वापरले गेले. उत्तरवादी क्रमांक २ ने इटलीतील खरेदीदाराच्या बँकरकडे निर्यात दस्तऐवज पोहोचवण्यासाठी अपीलकर्त्याच्या सेवा घेतल्या जे त्या बदल्यात कुरिअर कंपनी (उत्तरवादी क्रमांक ३) च्या सेवांना नियुक्त करते. निर्यात दस्तऐवज वाहतुकीदरम्यान हरवले होते.

६९. उत्तरवादी क्रमांक १ ने राज्य आयोगासमोर अपीलकर्ता, उत्तरवादी क्रमांक २ आणि उत्तरवादी क्रमांक ३ यांचे विरुद्ध ग्राहक तक्रार दाखल केली. दिनांक १० डिसेंबर २०१३ रोजीच्या आदेशाद्वारे अधिनियम, १९८६ च्या कलम २(१)(डी) नुसार परिभाषित केल्याप्रमाणे उत्तरवादी क्रमांक १ हा उपभोक्ता नाही या आधारावर तक्रार फेटाळण्यात आली जी

उत्तरवादी क्रमांक १ च्या विनंतीवरून लक्ष्मी इंजिनिअरिंग वर्क्स (वर उल्लेखित) मधील न्यायनिर्णयावर भर देत राष्ट्रीय आयोगासमोर दाखल केलेल्या अपीलात आव्हानात्मक विषय बनली आणि हर्सोलिया मोटर्सच्या प्रकरणातील न्यायनिर्णयाची दखल घेत, राष्ट्रीय आयोगाने असा निष्कर्ष नोंदवला की, बँकेने पाठवलेली कागदपत्रे जी वाहतुकीदरम्यान हरवली होती आणि इटालियन खरेदीदाराला व्यक्तिशः कधीच मिळालेली नव्हती, ती उत्तरवादीला कोणताही नफा मिळवून देण्याशी संबंधित नाहीत, कारण वास्तविक नफा हा निर्यात केलेल्या वस्तूंच्या विक्रीतून येईल, ज्याचा नफा निर्माण करण्याच्या क्रियाकलापांशी कोणताही संबंध नाही.

७०. आम्ही पक्षांच्या अधिवक्त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि २००७ च्या दिवाणी अपील क्रमांक ५३५२-५३५३ (नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - विरुद्ध - हर्सोलिया मोटर्स) मध्ये या न्यायालयाने व्यक्त केलेल्या मताचा विचार केल्यानंतर, असे आढळते की, प्रस्तूतचे अपील तथ्यहीन आहे आणि त्यानुसार ते फेटाळले जाते. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

७१. तक्रार राज्य आयोगाच्या फाईलवर पुनर्स्थापित केल्या जाते आणि कायद्यानुसार गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा आणि शक्य तितक्या लवकर निर्णय घेण्यात यावा, परंतु कोणत्याही परिस्थितीत हा निर्णय एका वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर घेण्यात येऊ नये.

७२. प्रलंबित असलेला अर्ज (असलेले अर्ज) निकाली काढले जातात.

२०२३ चा दिवाणी अर्ज क्रमांक

(@ विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक २०२० चा १०३९ (आयएफएफसीओ (IFFCO) टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - विरुद्ध - मेसर्स ओपीजी (OPG) एनर्जी (पी) लिमिटेड.

७३. अनुमती दिली.

७४. राष्ट्रीय आयोगाने पारित केलेल्या दिनांक २७ सप्टेंबर २०१९ च्या निर्णय आणि आदेशाविरोधात विशेष अनुमती घेऊन प्रस्तूतचे अपील दाखल करण्यात आले आहे.

७५. आम्ही पक्षकारांच्या अधिवक्त्यांचे म्हणणे ऐकले आहे आणि सुरुवातीला तथ्यांची दखल घेत ग्राहक मंचाने १२ सप्टेंबर २०१४ रोजी अपीलकर्त्याच्या विरोधात एकतर्फी आदेश पारित केला होता, ज्याच्या अनुषंगाने अपीलकर्त्याला तक्रारीच्या तारखेपासून म्हणजे ८ एप्रिल २०११ पासून वार्षिक ९ टक्के व्याजासह ९,५७,९०३/- रुपये आणि दाव्यासाठी रुपये ५०००/- देण्याचे निर्देश देण्यात आले होते. राज्य आयोग आणि राष्ट्रीय आयोगासमोर अपीलकर्त्याच्या विनंतीवरून दाखल केलेले अपील/पुनरीक्षण हे दोन्ही अनुक्रमे २५ जून २०१९ आणि २७ सप्टेंबर २०१९ रोजीच्या आदेशांद्वारे फेटाळण्यात आले.

७६. आम्ही पक्षांच्या अधिवक्त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर, आक्षेपित आदेशात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण सापडत नाही आणि त्यानुसार तो फेटाळला जातो. खर्चाबाबत आदेश नाही.

७७. प्रलंबित असलेला अर्ज (असलेले अर्ज) निकाली काढले जातात.

फूट नोट्स ची सूची -

[१](१९९५) ३ एससीसी ५८३

[२] (२००९) ९ एससीसी ७९

[३] (१९९४) १ एससीसी २४३

[४] (२०२०) २ एससीसी २६५

[५] (२०१८) १४ एससीसी ८१

[६] (२०२२) ५ एससीसी ४२

[७] (२००९) ३ एससीसी २४०

[८] (२०००) १ एससीसी ५१२

[९] (१९९६) ९ एससीसी ४२२

[१०] (२०२२) ६ एससीसी १

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".